| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/४००३/२०२३ दिनांक :- ११ /०७/२०२३

## प्रेसनोट

फरासखाना वाहतूक विभागाअंतर्गत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (पुणे मेट्रो) यांचेमार्फत पुणे मेट्रोचे काम सुरु असून सदर कामाअंतर्गत साततोटी पोलीस चौकी, कसबा पेठ येथुन बुधवार पेठ मेट्रो स्टेशन पर्यंत पादचारी भुयारी मार्ग करण्यात येणार असल्याने पवळे चौक ते कमला नेहरु चौक (अगरवाला रोड) या परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, त्या अुनषंगाने फरासखाना वाहतुक विभागा अंतर्गत अगरवाल रोडवरील वाहतूकीत दि. ११/०७/२०२३ रोजीपासून सदरचे काम पुर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

**फरासखाना वाहतूक विभागा अंतर्गत**

- **पवळे चौक ते कमला नेहरु चौक (अगरवाल रोड) दरम्यान तीन चाकी, चारचाकी व जड वाहनांचे वाहतूकीस तात्पुरत्या स्वरुपात बंदी करण्यात येत आहे.**

✓ **पर्यायी मार्ग**

**अ) पवळे चौकातून अगरवाल रोडने कमला नेहरु हॉस्पीटलकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी :-**

१) पवळे चौकातून पुण्यश्वर रोडने कुंभारवेस चौक मार्गे कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय उजवीकडे वळून बाबुराव आव्हाड पथ रोडने इच्छितस्थळी

२) पवळे चौकातून दगडी पाल रोडने मानिक चौक मार्गे फडके हौद चौक, गणेश रोडने इच्छितस्थळी

**ब) कमला नेहरु हॉस्पीटल चौकातून आगरवाल रोडने पवळे चौकाकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी :-**

१) कमला नेहरु चौकातून डावीकडे वळून महाराणा प्रताप रोडने देवजीबाबा चौक गणेश रोडने इच्छितस्थळी

२) कमला नेहरु चौक उजवीकडे वळून बाबुराव आव्हाड पथ मार्गे कसबा पेठ क्षेत्रिय कार्यालय, डावीकडे वळून कुंभारवेस मार्गे वीर संताजी घोरपडे रोडने इच्छितस्थळी

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- सर्व संबंधितांना